# MAHARASHTRA POLLUTION CONTROL BOARD

Tel:24010437/24020781
Fax: 24024068 / 24023516
Website: http://mpcb.gov.in
E-mail : pso@mpcb.gov.in

Kalpataru Point, 2nd - 4th Flr.
Opp. Cine Planet Cinema,
Near Sion Circle, Sion (E)
Mumbai-400 022.

"Your Service is our Duty"

No. MPCB/BMW/Circular/ PS O/ 241011-FTS - 0040 Date: 11.10.2024

## Circular

**Sub: - Revision of Fees Structure for Health Care Establishments and Common Bio Medical Waste Treatment Facilities in state of Maharashtra.**

**Ref:** - 1) Environment Dept., Government of Maharashtra Resolution vide No.ENV1098/ 551/PK- 259/TK.1, dated 10/04/2003.
2) Environment Dept., Government of Maharashtra Resolution vide No. MPCB2011/PK26/TK-2, dated 25/08/2011.
3) Bio Medical Waste Management Rules, 2016 Notification issued by MoEF & CC, GOI vide dated 28/03/2016.
4) Environment Dept. Government of Maharashtra Resolution vide No. BMW2022/PK.56/TK.1, dated 10/10/2022.
5) Environment Dept. Government of Maharashtra Resolution vide No. BMW 0724/PK.57/TK.1, dated 21/08/2024.

MoEF & CC Govt. of India has issued Bio-Medical Waste (M & H) Rules, 1998 as amended in 2016. MPC Board is statutory body and implementing the Bio-Medical Waste (M & H) Rules, 1998 as amended in 2016.

In accordance with the Biomedical Waste (M& H) Rules, 1998 as amended in 2016, Environment Dept. Government of Maharashtra vide reference 4 above has issued GR dated 10/10/2022 wherein, the fees required for obtaining Bio Medical Waste Authorization were cancelled & had imposed revised fees towards obtaining Combined Consent & Biomedical Waste Authorization based on the capital investment outlined in the Government Resolution dated 25/08/2011 at reference 2 above.

Environment Dept. Govt. of Maharashtra has now issued revised fee structure for Health Care Establishments and Common Biomedical Waste Treatment Facility vide GR vide dated 21/08/2024 copy of the same is enclosed herewith.

The GR dated 21/08/2024 issued by Environment Dept. Govt. of Maharashtra shall come into force from 21/08/2024 & all the officers of the Board are hereby directed to obtain Combined Consent & Biomedical Waste Authorization fees as per the Govt. Resolution.

This revised fee's structure is not applicable to establishments that have already applied for Combined Consent & Biomedical Waste Authorization & have already paid the CCA fees as per prevailing Rules.

The above revised fee structure shall be effective to all the application received for Combined Consent and Biomedical Waste Authorization from 21/08/2024.

All the Officers of the Board should implement this circular scrupulously without fail.

**DA: copy of GR dated 21/08/2024**

**(Dr. Avinash Dhakne, IAS)**
**Member Secretary**

**Copy submitted to:** The Hon'ble Chairman, MPC Board Mumbai- for favor of information.

**Copy to:**

1. **All HODs, MPC Board, Mumbai** - For information and necessary action
2. **Chief Account Officer, MPC Board**, Mumbai- For information
3. **PRO, MPCB Mumbai**. He is directed to give publicity of the GR by way of news, awareness in leading newspapers.
4. **All Regional Officer-** They are directed to ensure that the above circular shall be brough to the notice of all Medical Associations and Common Biomedical Waste Treatment Facilities in their jurisdiction & give wide publicity.
5. **All Sub Regional Officer**- They are directed to ensure that the above circular shall be brough to the notice of all medical associations and Common Biomedical Waste Treatment Facilities in their jurisdiction & give wide publicity.
6. **SO/EIC**- He is directed to host the circular on Board's Website and make necessary changes in Combined Consent and Bio Medical Waste Authorization application listed industry type R-14, O-88 and R-30.

**महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळातर्फे सर्व वैद्यकीय आस्थापना व जैव वैद्यकीय कचरा व्यवस्थापन बाबत सुविधा पुरविणाऱ्या प्रकल्पांसाठी सामायिक संमतीपत्र व जैव वैद्यकीय कचरा नियमांअंतर्गत प्राधिकारपत्रासाठी (Combined Consent and BMW Authorization) आकारण्यात येणाऱ्या संमतीपत्र शुल्कात सुधारणा करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग**
**शासन निर्णय क्र.जैवैक ०७२४/प्र.क्र.५७ /तां.क. १**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२
दिनांक : २१ ऑगस्ट, २०२४.

<u>वाचा</u> :-

१. शासन निर्णय क्र.इएनव्ही १०९८/५५९/प्र.क्र.२५९/तां.क.१ दिनांक १० एप्रिल,२००३.
२. शासन निर्णय क्र.मप्रनि२०११/प्र.क्र.२६/तां.क.२ दिनांक २५ ऑगस्ट, २०११ .
३. केंद्रीय पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालयाने दिनांक २८मार्च, २०१६ अन्वये निर्गमित केलेले जैव वैद्यकीय कचरा (व्यवस्थापन) नियम, २०१६.
४. शासन निर्णय क्र. जैवैक २०२२/प्र.क्र.५६/तां.क.१ दिनांक १० ऑक्टोबर, २०२२.

<u>प्रस्तावना</u> :-

जैववैद्यकीय कचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम, १९९८ मधील तरतुदीनुसार सर्व वैद्यकीय आस्थापनांनी जैव वैद्यकीय कचरा व्यवस्थापन प्राधिकारपत्रासाठी (Authorisation) अर्ज करताना सुधारित फी आकारण्याबाबत दिनांक १० एप्रिल, २००३ च्या शासन निर्णयान्वये मार्गदर्शक तत्वे विहीत करण्यात आलेली होती.

केंद्रीय पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालयाने दिनांक २८ मार्च, २०१६ अन्वये निर्गमित केलेले जैव वैद्यकीय कचरा (व्यवस्थापन) नियम, २०१६ जैव वैद्यकीय कचरा निर्माण होणाऱ्या सर्व प्रकारच्या वैद्यकीय आस्थापनांना व जैव वैद्यकीय कचरा व्यवस्थापन करणाऱ्या प्रकल्प केंद्रांना लागू करण्यात आलेले आहेत.

तसेच, केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने सन २०१२ पासून वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशांन्वये वैद्यकीय आस्थापनांना व जैव वैद्यकीय कचरा व्यवस्थापन करणाऱ्या प्रकल्प केंद्रांना उद्योग या संवर्गात वर्गीकृत केलेले आहे. त्यानुसार सर्व वैद्यकीय आस्थापनांना व जैव वैद्यकीय कचरा व्यवस्थापन करणाऱ्या प्रकल्प केंद्रांना महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून जल (प्रतिबंध व प्रदुषण नियंत्रण ) कायदा,१९७४ व हवा (प्रतिबंध व प्रदुषण नियंत्रण ) कायदा, १९८१ अन्वये संमतीपत्र घेणे बंधनकारक आहे.

सर्व वैद्यकीय आस्थापनांना व जैव वैद्यकीय कचरा व्यवस्थापन करणाऱ्या प्रकल्प केंद्रांना जैव वैद्यकीय कचरा व्यवस्थापन नियम, २०१६ अन्वये जैव वैद्यकीय कचरा व्यवस्थापन प्राधिकारपत्र (BMWM Authorisation) आणि दिनांक २५ ऑगस्ट,२०११ रोजीच्या शासन निर्णयानुसार, जल (प्रतिबंध व प्रदुषण नियंत्रण ) कायदा,१९७४ व हवा (प्रतिबंध व प्रदुषण नियंत्रण ) कायदा, १९८१

अंतर्गत संमतीपत्र (Consent) स्वतंत्रपणे निर्गमित करण्याऐवजी “सामायिक संमतीपत्र व जैव वैद्यकीय कचरा नियमांअंतर्गत प्राधिकारपत्र” (Combined Consent and BMW Authorization) प्राप्त करणे अनिवार्य आहे. वैद्यकीय आस्थापनांना जैव वैद्यकीय कचरा नियमांअंतर्गत प्राधिकारपत्र व संमतीपत्र प्राप्त करणे करिता स्वतंत्रपणे शुल्क आकारणी करण्यात येत होती. या शुल्कापैकी वैद्यकीय आस्थापनांना जैव वैद्यकीय कचरा प्राधिकारपत्रकरिता देय असलेले प्राधिकारपत्र शुल्क दिनांक १० ऑक्टोबर,२०२२ च्या शासन निर्णयानुसार रद्द करण्यात आले आहे.

इंडियन मेडिकल असोसिएशन आणि महाराष्ट्र नेत्ररोग शास्त्र सोसायटीकडून मालमत्ता-आधारित शुल्क हटवून सुलभ शुल्क संरचना लागू करण्याच्या विनंती महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाला केली होती. त्यामुळे, सर्व वैद्यकीय आस्थापनांना आणि जैव वैद्यकीय कचरा व्यवस्थापन केंद्र साठी “सामायिक संमतीपत्र व जैव वैद्यकीय कचरा व्यवस्थापन प्राधिकारपत्र” (Combined Consent and BMWM Authorization) आकारण्यात येणाऱ्या संमतीशुल्कच्या संरचनेचे पुनर्मूल्यांकन आणि पुनरावलोकन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे:-

**शासन निर्णयः-**

जैव वैद्यकीय कचरा व्यवस्थापन नियम, २०१६ मध्ये अंतर्भूत राज्यातील सर्व वैद्यकीय आस्थापना व जैव वैद्यकीय कचरा व्यवस्थापन बाबत सुविधा पुरविणारे प्रकल्प केंद्रांना महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून सामायिक संमतीपत्र व जैव वैद्यकीय कचरा व्यवस्थापन प्राधिकारपत्र (Combined Consent and BMWM Authorization) आकारण्यात येणाऱ्या सुधारित संमतीपत्र शुल्क पुढीलप्रमाणे आकारण्यात येईल.

१. **सर्व वैद्यकीय आस्थापना व जैव वैद्यकीय कचरा व्यवस्थापन बाबत सुविधा पुरविणाऱ्या प्रकल्प केंद्रांसाठी (राज्य आणि केंद्रीय सरकारी आरोग्य सेवा आस्थापनांव्यतिरिक्त)**

| **क्रमांक** | **वैद्यकीय आस्थापना** | **शुल्क (रुपयात) प्रति कार्यकाळ ( per term)** |
|---|---|---|
| १ | शून्य रुग्णशय्या (*) | १०००/- (शून्य रुग्णशय्या साठी एक कार्यकाळ = तीन वर्षे) |
| २ | १-१० रुग्णशय्या | २०००/- |
| ३ | ११-५० रुग्णशय्या | ५००० /- |
| ४ | ५१-१०० रुग्णशय्या | १५००० /- |
| ५ | १०१-३०० रुग्णशय्या | ५०००० /- |
| ६ | ३०१- ५०० रुग्णशय्या | १००००० /- |
| ७ | ५०१ -१००० रुग्णशय्या | २००००० /- |
| ८ | १००० पेक्षा जास्त रुग्णशय्या | ५,००,००० /- |
| ९ | पॅथोलॉजिकल प्रयोगशाळा, रक्तपेढी, डायग्नोस्टिक सेंटर | ५०००/- |
| १० | जैव वैद्यकीय कचरा व्यवस्थापन केंद्र | १,००,०००/- |

टीप: संशोधन व विकास कामे (R & D activities) आणि जे उद्योग जैव वैद्यकीय कचरा निर्माण करतात, त्यांनी दिनांक २५ ऑगस्ट,२०११ च्या शासन निर्णयात नमूद केलेल्या भांडवली गुंतवणुकीच्या आधारावर सामायिक संमतीपत्र व जैव वैद्यकीय कचरा व्यवस्थापन प्राधिकारपत्र प्राप्त करावे.

**२. राज्य आणि केंद्रीय सरकारी आरोग्य सेवा आस्थापनांसाठी (**) रुग्णशय्येच्या वर्गीकरणावर आधारित संमतीपत्र नि:शुल्क दराने लागू होईल.**

[* - *शून्य रुग्णशय्या आरोग्य सेवा आस्थापने उदा. ॲलोपॅथी क्लिनिक्स आणि डिस्पेन्सरी, आयुर्वेदिक क्लिनिक्स आणि डिस्पेन्सरी, युनानी आणि होमिओपॅथिक क्लिनिक्स आणि डिस्पेन्सरी, पोली क्लिनिक्स आणि डिस्पेन्सरी, ॲक्युपंक्चर आणि फिजिओथेरपी केंद्र, दंत चिकित्सा, नेत्ररोग आणि त्वचा देखभाल क्लिनिक्स, पशुवैद्यकीय क्लिनिक, रक्तदान शिबिरे, नेत्र आणि आरोग्य तपासणी शिबिरे, नमुना संकलन केंद्र.*]

*[** - राज्य आणि केंद्रीय सरकारी आरोग्य सेवा आस्थापने उदा. सार्वजनिक आरोग्य विभागाचे रुग्णालय, बाल आणि प्रसूती विभाग, आयुर्वेदिक आणि आयुष विभाग, राज्य आणि केंद्रीय सरकारचे पशुवैद्यकीय रुग्णालय, कर्मचारी राज्य विमा महामंडळ, मानसिक आरोग्य संस्था, संरक्षण विभाग, गृह विभागाचे रुग्णालये आणि फॉरेन्सिक लॅबोरेटरी, अन्न आणि औषध प्रशासन विभागाच्या संशोधन आणि विकास क्रिया, भारतीय रेल्वे, रक्तपेढी, सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळा, सरकारी वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालये इत्यादी.]*

वरील प्रमाणे सुधारित केलेले संमतीपत्र शुल्क हे शासन निर्णय निर्गमित झालेल्या दिनांकापासून लागू होईल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२४०८२२१२१०३३४७०४ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकीत करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SURYAKANT KISAN NIKAM

Digitally signed by SURYAKANT KISAN NIKAM
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=ENVIRONMENT AND CLIMATE CHANGE DEPARTMENT, 2.5.4.20=3978ce8e745a91e0561f6f9473df7e92873ee7ac8c2f7c49ac520e61061ddded, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=3A94A1F658A34D45CA2859DBC88DFB40760079B8946087EF0FB8BC7CD7314C27, cn=SURYAKANT KISAN NIKAM
Date: 2024.08.22 12:28:31 +05'30'

**( सु. कि. निकम )**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१.मा. मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव , मंत्रालय. मुंबई
२. प्रधान सचिव (पर्यावरण व वातावरणीय बदल ) मंत्रालय,मुंबई.
३.प्रधान सचिव (सार्वजनिक आरोग्य विभाग), मंत्रालय,मुंबई.
४.प्रधान सचिव (वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग), मंत्रालय,मुंबई.
५.सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, मुंबई.
६.सर्व महानगरपालिका आयुक्त, महानगरपालिका,
७.सर्व जिल्हाधिकारी,

८.सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद
९.संचालक,आरोग्य सेवा,महाराष्ट्र राज्य,मुंबई.
१०.संचालक,वैद्यकिय शिक्षण व संशोधन, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
११.निवडनस्ती (तां.क.१)